# सोमवंशी पाठारे क्षत्रिय समाजोन्नति संघ ट्रस्ट फंड
## SOMAVANSHI PATHARE KSHATRIYA SAMAJONNATI SANGH TRUST FUND

स्थापना : ३ एप्रिल १९१०

नोंदणी क्रमांक ए-३९५ (मुंबई)

ई-मेल : spkssangh@gmail.com वेब-साईट : www.chaukalshivadval.com

मुंबई कार्यालय : कर्मवीर ज. पां. राऊत वसतिगृह, १०२, विठ्ठलेश, दामोदर म्हात्रे मार्ग, दहिसर (पश्चिम), मुंबई-४०० ०६८.

पालघर कार्यालय : डॉ. मधुकर बळवंत राऊत स्मारक समाज मंदिर, बोईसर मार्ग, जुना पालघर, ता.जि. पालघर-४०१ ४०४.


दिनांक:- १३ / १२ / २०२२

## क्रिडास्पर्धा समिती २०२२-२३

सोमवंशी पाठारे क्षत्रिय समाजोन्नति संघ ट्रस्ट फंडच्या क्रिडास्पर्धा समितीच्या विद्यमाने संघाच्या युवा विकास समिती आणि महिला स्पर्धा समितीच्या सहयोगाने वार्षिक क्रिडास्पर्धा यावर्षी दिनांक २४, २५ डिसेंबर २०२२ ला आयोजित करण्यात येणार असून त्यासंबंधीचे काही नियम खालीलप्रमाणे आहेत.

१. वार्षिक क्रिडास्पर्धा दि. **२४, २५ डिसेंबर २०२२** रोजी उमरोळी, साईग्राम विकास मंडळाच्या उमरोळी स्टेशन पश्चिम येथील मैदानात भरविण्यात आली आहे.

२. दिनांक **२४ डिसेंबर २०२२** रोजी पुरुष संघांतील क्रिकेट स्पर्धा भरविण्यांत येणार असुन या स्पर्धा शाखांशाखांतुन येणाऱ्या संघांमध्ये खेळविण्यात येणार आहे.

३. दिनांक **२५ डिसेंबर २०२२** रोजी धावणे, चमचागोटी, भालाफेक, गोळाफेक, थाळीफेक, लांबउडी इत्यादी वैयक्तिक स्पर्धा आयोजित करण्यांत आल्या आहेत. तसेच महिला क्रिकेट स्पर्धा, पुरुष व्हॉलिबॉल स्पर्धाही आयोजित केल्या जातील.

४. कॅरम व बुध्दीबळ स्पर्धेतील अंतिम सामने रविवार दिनांक **०८ / ०१ / २०२३** रोजी संघाच्या डॉ. मधुकर बळवंत राऊत स्मारक समाजमंदीर, पालघर (प.) येथे सकाळी ठिक १०.०० वाजता भरविण्यांत येतील.

**५. प्रत्येक खेळाडूने स्पर्धेदिवशी सकाळी ८.३० वा. ध्वजारोहण व संध्याकाळी ध्वजावतरण कार्यक्रमास उपस्थित राहणे बंधनकारक आहे.**

६. संपुर्ण स्पर्धेचे नियंत्रण संघाच्या क्रिडास्पर्धा समितीच्या नेतृत्वाखाली युवा विकास समिती तसेच महिला स्पर्धा समितीच्या सहयोगातून करण्यात येईल.

७. या स्पर्धेसाठी तांत्रिक समिती नेमण्यात येईल व स्पर्धेदरम्यानची कोणत्याही स्वरुपाची तक्रार असल्यास सदर समितीकडे लेखी दिल्यास त्या तक्रारीचे निवारण करण्याचे काम ही समिती करेल.

८. स्पर्धेदरम्यान मद्यपान, मादक / उत्तेजक पदार्थसेवन, धुम्रपान व कोणतेही गैरवर्तन, असभ्य / अर्वाच्य भाषेचा वापर अथवा चिथावणीखोर वक्तव्य करणाऱ्या खेळाडुस तत्क्षणी स्पर्धेबाहेर व क्रिडांगण परिसराबाहेर काढण्यात येईल.

**मुले व मुलींसाठी घ्यावयाच्या वैयक्तिक स्पर्धा :-**

१. वय ४ वर्षे पुर्ण ते ६ वर्षे आतील स्पर्धक :- धावणे (३० मी.),

२. वय ६ वर्षे पुर्ण ते १० वर्षे आतील स्पर्धक :- धावणे (६० मी.), चमचा-ग़ोटी (२५ मी.), लांबउडी

३. वय १० वर्षे पुर्ण ते १४ वर्षे आतील स्पर्धक :- धावणे (१०० मी.), लांबउडी,

४. वय १४ वर्षे पुर्ण ते १६ वर्षे आतील स्पर्धक :- धावणे (१०० मी.) लांबउडी, गोळाफेक

५. वय १६ वर्षे पुर्ण ते ४५ वर्षे आतील स्पर्धक (खुलागट ) :- धावणे (१०० मी.), लांबउडी, गोळाफेक, थाळीफेक

**६. वय ४५ वर्षांवरील (प्रौढ गट) :- धावणे (१०० मी.) स्पर्धा**

७. प्रत्येक खेळाडूने आधारकार्ड किंवा आयकार्डची प्रत सोबत / मोबाईलवर आणावी.

८. मुख्य स्पर्धेतील गोळाफेकीतील वय १४ वर्षे पुर्ण ते १६ वर्षे आतील सर्व स्पर्धकांसाठी व वय १६ वर्षे पुर्ण ते पुढील वयाचे स्पर्धक (महिला / मुली खुलागट ) साठी ४ किलो तर वय १६ वर्षे पुर्ण ते पुढील वयाचे स्पर्धक (खुलागट पुरुष / मुले ) साठी ६ किलो वजनाचा / आकाराचा गोळा वापरण्यात येईल.

**सांघिक स्पर्धा :-**

सोमवंशी पाठारे क्षत्रिय समाजोन्नति संघ ट्रस्ट फंड

SOMAVANSHI PATHARE KSHATRIYA SAMAJONNATI SANGH TRUST FUND

सो. पा. क्ष. स. संघ १९१०

स्थापना : ३ एप्रिल १९१०

नोंदणी क्रमांक ए-३९५ (मुंबई)

ई-मेल : spkssangh@gmail.com वेब-साईट : www.chaukalshivadval.com

मुंबई कार्यालय : कर्मवीर ज. पां. राऊत वसतिगृह, १०२, विठ्ठलेश, दामोदर म्हात्रे मार्ग, दहिसर (पश्चिम), मुंबई-४०० ०६८.

पालघर कार्यालय : डॉ. मधुकर बळवंत राऊत स्मारक समाज मंदिर, बोईसर मार्ग, जुना पालघर, ता.जि. पालघर-४०१ ४०४.


१. सर्व सांघिक स्पर्धासाठी त्रयस्थ पंचांची नेमणुक करण्यात येईल व पंचांचा निर्णय अंतिम असेल.

२. क्रिकेट, व्हॉलिबॉल या सांघिक स्पर्धा या वर्षी शाखांच्या संघांमध्ये खेळवली जाईल.

३. **१८ डिसेंबर रोजी नोंदणीची अंतिम तारीख राहील व त्याच दिवशी सामन्यांसाठीच्या सोडती काढण्यात येतील. त्यानंतर आलेल्या कोणत्याही संघांचा विचार स्पर्धेसाठी केला जाणार नाही.**

४. **ज्या शाखांत पुर्ण संघ होण्यासाठी पुरेसे खेळाडु उपलब्ध नसतील त्यांनी समितीशी संपर्क करुन उपलब्ध खेळाडुंची नावे समितीकडे कळविल्यास त्या सर्व खेळाडुंना इतर संघातुन खेळविण्याची सोय केली जाईल.**

५. वय वर्षे १६ पुर्ण केलेल्या खेळाडुंनाच क्रिकेटमध्ये सहभागी होता येईल.

६. क्रिकेट सांघिक स्पर्धेमध्ये सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या सर्व संघांनी ६००/- प्रवेश फी नोंदणीवेळी म्हणजेच १८ डिसेंबरला वा तत्पूर्वीच भरावी लागेल. नोंदणीवेळी प्रवेश फी व आधारकार्ड / आयकार्ड क्रमांक दाखविल्याशिवाय खेळाडुस स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

७. व्हॉलिबॉल सांघिक स्पर्धेमध्ये सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या सर्व संघांनी २००/- प्रवेश फी नोंदणीवेळी म्हणजेच १८ डिसेंबरला वा तत्पूर्वीच भरावी लागेल.

८. नोंदणीवेळी व स्पर्धेदिवशी प्रत्येक खेळाडूने आधारकार्डाची वा आयकार्डाची प्रत सोबत/ मोबाईलवर आणावी.

९. प्रवेश फी (पुरुष क्रिकेट व पुरुष व्हॉलिबॉल साठी) व आधारकार्ड / आयकार्ड क्रमांक दाखविल्याशिवाय खेळाडुस स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

१०. तांत्रिक समितीकडे एखादी तक्रार आल्यास त्यातील संघाशी वा खेळाडूशी संबंधित व्यक्ती त्या तक्रारीपुरता तांत्रिक समिती सदस्य राहणार नाही.

११. क्रिकेट स्पर्धेसाठी त्रयस्थ पंच नेमण्यात येतील. कृपया कोणीही त्यांच्याशी ओळख दाखविण्याचा वा जवळीक साधण्याचा प्रयत्न करू नये. तसे करणाऱ्यांस प्रतिबंधाच्या कारवाईस सामोरे जावे लागेल.

आपले विनित

किरण नंदकुमार पाटील
निमंत्रक

हार्दिक सुधाकर राऊत
कार्याध्यक्ष